नि.क्र. १०८

**<u>वादीचा साक्षीदार क्र. ३ यांचा उलटतपास प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री डी.टी. पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

संभू आलुरे माझे चुलत भाऊ आहेत. मी प्रल्हाद मोतीराम आलुरे यांना ओळखतो. प्रल्हादला जमीन होती परंतू ती विकली आहे. प्रल्हादला त्याच गटात जमीन होती, त्याचे क्षेत्रफळ मला माहीत नाही. प्रल्हादच्या जमीनीच्या पुर्वेकडून विश्वनाथ आलुरे यांची जमीन आहे. प्रल्हादच्या जमीनीच्या उत्तरेस लगत वडवळची शिव आहे. प्रल्हादच्या जमीनीच्या पश्चीमेस बबन आलुरे व भिमा आलुरे यांची जमीन आहे.

२. आत्माराम शिंदे यांना मी ओळखतो. मी गट क्र. १०७ चा ७/१२ पाहिलेला नाही. आत्माराम शिंदे यांना किती जमीन आहे हे माहीत नाही. आत्माराम शिंदे यांना गट क्र. १०७ मध्ये जमीन नाही. आत्माराम शिंदे यांची जमीन मी पाहीली नाही. माझी जमीन वडवळ शिवारात आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, माझी जमीन तेथे नाही, माझे भावाची आहे. माझी जमीन गट क्र. १०७ पासून १ ते २ कि.मी. वर आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र १०७ मध्ये माझे जाणे येणे नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी वाटणीच्या वेळी गेलो होतो. वाटणी होऊन १५ वर्ष झाले आहे. वाटणी संभू, विश्वनाथ व प्रल्हादमध्ये झाल्या होत्या. ती वाटणी अंदाजे गट क्र. १०७, १०८ मध्ये झाली होती. हे मला माहीत नाही की, विश्वनाथ आलुरे यांना वाटणीमध्ये कोणत्या गटात जमीन दिली होती. त्याच्या चतु:सिमा मला माहीत नाहीत.

३. गट क्र. १०७ मध्ये कोण कोण भाग धारक आहेत, याची माहीती आहे. त्या संभू आलुरे हे भाग धारक आहेत, इतर कोण आहेत हे

मला माहीत नाही. मला महेबुबबी यांची गट क्र. १०७ मधील जमीन माहीत आहे. महेबुबबी च्या जमीनीच्या पुर्वेकडून भिमा आलुरे आहेत. गट क्र. १०७ च्या दक्षणीकडे गट क्र. १०७ आहे, गट क्र. १०७ च्या पुर्वेला गट क्र. १०८ आहे.

४. माझे शपथपत्र देत असतांना माझी व संभू आलुरे यांची सतत भेट होत होती. वळीबा शिंदे यांना तीन मुले आहेत. हे मला लक्षात नाही की, वळीबा शिंदे यांना गट क्र. १०७ मध्ये किती जमीन होती. वळीबा शिंदे यांची तीन मुलांचे गट क्र. १०७ मधील जमीनीचे हिस्से मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्र संभू यांच्या सांगण्यावरुन दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2025.08.05 11:38:35 +0530

( व्ही. एस. वाघमोडे )

दि. ०५/०८/२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर चाकूर